प्रेस नोट                                    दिनांक :– २१/११/२०२२

आरोपी लोकसेवक यांनी लाचेच्या रक्कमेची मागणी करुन ती स्विकारल्याने अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे विभागाने त्यांना ताब्यात घेतले बाबत.

| | |
|---|---|
| अॅन्टी करप्शन ब्युरो /घटक | ठाणे |
| गुन्हा नोंद कमांक | –– |
| आरोपी लोकसेवकाचे/खाजगी इसमाचे नाव व कार्यालय | सुरेंद्र काशिनाथ संखे, मंडळ अधिकारी (वर्ग–३), कंचाड, मंडळ अधिकारी कार्यालय, ता.वाडा जि. पालघर |
| मागितलेली लाचेची रक्कम | ३०,०००/– रुपये |
| तडजोडीअंती ठरलेली लाचेची रक्कम | २५,०००/– रुपये |
| स्विकारली लाचेची रक्कम | स्विकारलेली १५,०००/– रुपये |
| थोडक्यात हकीकत | यातील तकारदार यांनी खानिवली गाव ता. वाडा येथे सर्व्हे नं. १०५ मधील १ हेक्टर ३३ आर ही जमीन खरेदी केली असुन त्याबाबत फेरफार नोंद करण्यासाठी लोकसेवक सुरेंद्र काशिनाथ संखे वय ५७, मंडळ अधिकारी, कंचाड, ता. वाडा, जि. पालघर यांनी ३०,०००/–**रुपये लाचेच्या रक्कमेची** मागणी केल्याबाबत दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक २१/११/२०२२ रोजी लोकसेवक सुरेंद्र संखे यांची तकारदार हे मंडळ अधिकारी, कार्यालय कंचड येथे समक्ष भेट घेतली असता, लोकसेवक संखे यांनी तक्रारदार यांचेकडे तडजोडीअंती २५०००/– रुपये लाचेच्या रक्कमेची मागणी केल्याचे पडताळणी दरम्यान निष्पन्न झाले. त्याअनुषंगाने लागलीच आज दि. २१/११/२०२२ रोजी कंचाड, मंडळ अधिकारी, कार्यालय येथे सापळा आजमाविला असता, सापळा कारवाई दरम्यान तक्रारदार हे लोकसेवक सुरेंद्र संखे यांनी मागणी केल्याप्रमाणे लाचेची रक्कम देण्याकरीता समक्ष भेटले असता, लोकसेवक श्री. सुरेंद्र संखे यांनी त्यांचे कॅबीनमधे १५०००/–रुपये लाचेची रक्कम स्विकारली असतांना १५.५५ वा. रंगेहाथ पकडण्यात आले आहे. सदरबाबत गुन्हा नोंदविण्याची कारवाई वाडा पोलीस स्टेशन येथे सुरु आहे. |

मार्गदर्शनअधिकारी– **मा. श्री. सुनिल लोखंडे, पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे**
**मा. श्री. अनिल घेरडीकर, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे**

अॅन्टी करप्शन ब्युरो ठाणे विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारा संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र ठाणे यांचेशी संपर्क करावा

---

संपर्क पत्ता :– लाप्रवि ठाणे मध्यवर्ती कारागृहासमोर, ठाणे पश्चिम ४००६०१
संकेत स्थळ :–acbmaharastra@mahapolice.gov.in
ईमेल–spacbthane@mahapolice. Gov.in
अॅप्लीकेशन –acbmaharastra.net,
टोल फ्रि नंबर –१०६४, दुरध्वनी कमांक –०२२–२०८१३५९८/२०८१३५९९
व्हॉटसअॅप् कमांक –९९३०९९७७००
दिनांक :– २१/११/२०२२

ASPatil

( अश्विनी पाटील )
पोलीस उप अधीक्षक,
अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे.